# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेसनोट क्रमांक ३११/२०२४ दिनांक- १९/०८/२०२४.

## "अनाधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या ०२ महिला बांगलादेशी नागरिकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई"

दिनांक १७.०८.२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना त्यांच्या बातमीदारामार्फत एव्हरशाईन वुड बिल्डींगच्या पाठीमागील झोपडपट्टी, सीएनजी पंप, बेवर्ली पार्करोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे बांगलादेशी नागरीक विनापरवाना राहत असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस पथक, पंच व दुभाषिक यांचेसह वरील नमुद ठिकाणी साफळा रचुन एव्हरशाईन वुड बिल्डींगच्या पाठीमागील झोपडपट्टी, सीएनजी पंप, बेवर्ली पार्करोड, मिरारोड पुर्व, या ठिकाणी बांगलादेशी नागरीक विनापरवाना राहत असल्याबाबत माहिती मिळाल्याने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दोन पंचासमक्ष वर नमुद ठिकाणी ०८.४५ वा. छापा टाकुन ०२ बांगलादेशी महिला ताब्यात घेवुन त्यांचेकडे केलेल्या चौकशीत ते बांगलादेशी नागरीक असल्याची कबुली दिल्याने सदर बाबत दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करुन ताब्यात घेतल्या बांगलादेशी नागरीकांविरुध्द सरकार तर्फे मपोशि/१४०६० शितल जाधव यांनी मिरारोड पोलीस ठाणे येथे फिर्याद दिल्याने मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा क्र. २६१/२०२४ पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३, ४ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १३,१४-अ (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाचे पोनि समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, रामचंद्र पाटील, शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/केशव शिंदे, पोशि/चेतनसिंग राजपुत मपोशि/अश्विनी भिलारे, मपोशि/शितल जाधव, चा.पोहवा/सम्राट गावडे सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

-------------0000-------------